# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०६ मे, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

# लॉकडाउन दरम्यान चंद्रपुर पोलीसांची कार्यवाही

जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला असुन कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, संपुर्ण महाराष्ट्रात गतीने पसरत असल्याने चंद्रपूर जिल्हयात या कोरोना (Covid-19) विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी जमावबंदी आदेश निर्गमित केले आहेत. सर्वत्र लॉकडाउन असतांना नागरीकांनी घराबाहेर पडु नये असे आदेश आहे. आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या इसमांवर त्याचप्रमाणे इतर आवश्यक महत्वपुर्ण कार्यवाही चंद्रपुर पोलीस करीत आहे. जेनेकरून सर्वत्र शांतता अबाधित राहील व कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही.

दिनांक ०५ में, २०२० रोजी जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ अन्वये ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. लॉकडाउनच्या काळात आज पावेतो एकुण ३३५ केसेस करण्यात आल्या असुन एकुण १०६४ वाहने जप्त व १७,६२,२७०/—रू दंड वसुल करण्यात आला आहे.

तरी, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी चंद्रपूर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन केले आहे की, चंद्रपूर जिल्हयात कोरोना (Covid-19) विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाद्वारे निर्गमित केलेल्या संचारबंदी आदेशाचे पालन नागरीकांनी काटेकोरपणे करुन स्वत:चे आणि इतरांचे जिव धोक्यात टाकु नये. तसेच पोलीसांना सहकार्य करावे. संचारबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# चिमुर पोलीसांची मोहा हातभट्टी चालविणाऱ्यांविरूध्द कार्यवाही

दिनांक ०५/०५/२०२० रोजी चिमुर पोलीस स्टेशन येथील पोलीस पथकाने पोस्टे हद्दीत आल आउट मोहिम राबवुन मौजा कवडशी माणुसमारी जंगल परिसर आणि मौजा मासळ येथे छापा असता मोठया प्रमाणात अवैध रित्या मोहासडवा आणि मोहासडवा तयार करण्यासाठी लागणारे साहीत्य मिळुन आले. सदरचा मुद्देमाल ताब्यात घेवुन १० आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एकुण ११,०७,४००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढिल तपास आणि आरोपींचा शोध चिमुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन चिमुर पोनि. श्री. स्वप्निल धुळे यांचे नेतृत्वात सपोनि. मोहोळ, पोहवा विलास निमगडे, विलास सोनुले, डोनु मोहुरले, नापोशि. किशोर बोढे, पोशि. दिनेश सुर्यवंशी, विनायक, सचिन, विशाल, भारत, शैलेश, सतिश, मपोशि. मयुरी यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

———————————————————————————————————